


दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २११ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.७ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे मुल एसडीओ कार्यालयातील सभागृहाच्या नूतनीकरणाचा मार्ग मोकळा

## आ. मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे १ कोटी ३० लक्ष रुपयांचा निधी मंजूर

## मुल येथील आढावा बैठकीत दुरवस्थेकडे लक्ष वेधून दिले होते नुतनीकरणाचे निर्देश

**मुल । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे मुल येथील एसडीओ कार्यालयातील सभागृहाचे नूतनीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच या कामाकरिता १ कोटी ३० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुल येथील आढावा बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधून तातडीने काम सुरू करण्याचे निर्देश दिले होते, हे विशेष.*आ.मुनगंटीवार यांच्या निर्देशांनंतर प्रशासनाने सभागृहाच्या नूतनीकरणासाठी आवश्यक निधीची मागणी केली होती. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या निधीसाठी पाठपुरावा केला व आता सभागृहाच्या नूतनीकरणासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.सभागृहाच्या नूतनीकरणामुळे प्रशासकीय बैठका आणि विविध कार्यक्रम अधिक चांगल्या पद्धतीने आयोजित करता येणार आहेत. त्याचा फायदा थेट नागरिकांना होणार आहे. त्यासोबतच, सभागृहाच्या नूतनीकरणामुळे स्थानिक प्रशासनाची कामकाजाची क्षमता वाढेल आणि नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.





### मुल तालुक्याचा चेहरामोहरा बदलला

मूल येथे मुख्य रस्ता, कर्मवीर मा.सा. कन्नमवार सभागृह, तहसील कार्यालय, पंचायत समितीची इमारत, पाणीपुरवठा योजना, स्टेडियम, डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, इको पार्क, स्विमिंग टँक, आठवडी बाजार असे विविध विकासकामे तालुक्यात झाली. १०० खाटांच्या मुल उपजिल्हा रुग्णालयाला मान्यता मिळाली, कामं प्रगतीपथावर आहे. सोमनाथ येथे भव्य कृषी महाविद्यालय उभे राहत आहे. तसेच मुलींसाठी शुरवी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत मुल तालुक्याचा चेहरामोहरा बदलला आहे.

# माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची समाज कल्याण न्यासाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड

## डॉ.विश्वास आरोटे यांच्याकडे उपाध्यक्षपदाची धुरा

**शिर्डी( राहुल फुंडे)- महाराष्ट्र राज्य समाजकल्याण न्यास या राज्यव्यापी सेवाभावी संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त शिर्डी येथे आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पदाधिकारी मेळाव्यात विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये शिवसेना (शिंदे गट) नेते व माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची एकमताने प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली असून, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात ठसा उमटवणारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच 'दैनिक समर्थ गावकरी'चे संपादक डॉ. विश्वास आरोटे यांच्यावर प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**




साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत शिर्डीच्या 'साई पालखी निवारा' येथे पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण मेळाव्यास हास्यप्रबोधनकार आणि समाजकल्याण न्यासाचे प्रवक्ते संजीवन म्हात्रे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे संस्थापक धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील, तसेच राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील कार्यकर्ते, महिला पदाधिकारी आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती यावेळी होती. कार्यक्रमाची सुरुवात साईबाबांच्या आरतीने झाली. दीपप्रज्वलनानंतर शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या भाषणात संजीवन म्हात्रे यांनी सामाजिक कार्याच्या प्रेरणादायी वाटचालीवर प्रकाश टाकत, केवळ पदाचा वापर कार्यक्रमपत्रिकांवर नाव झळकवण्यासाठी न करता, प्रत्यक्ष कृतीतून समाजससेवा करण्याचे आवाहन केले. समाजकल्याण हीच खरी ईश्वरसेवा या विचाराशी निष्ठा ठेवून गेल्या २४ वर्षांपासून कार्यरत असलेल्या या संस्थेच्या माध्यमातून हजारो गरजूंपर्यंत शैक्षणिक साहित्य, दिवाळी भेटवस्तू, साड्या, मिठाई तसेच ग्रामीण भागात म्बुलन्स व आरोग्य शिबिरांसारख्या उपक्रमांनी पोहोचण्यात आले आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने या संधीचे सोने करून समाजाशी जोडलेले राहावे, असे ते म्हणाले.धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, संस्थेची स्थापना केवळ सेवाभावातून झाली असून, कोणत्याही राजकीय हेतूशिवाय केवळ समाजहित डोळ्यासमोर ठेवून कार्य केले जात आहे. माणसातील माणूसपण जागं करणे हे या संस्थेचे ध्येय आहे. आपण काही मिळवण्यासाठी नव्हे, तर देण्यासाठी आहोत, हा विचार रुजवणारी ही संस्था असून, 'सबका मालिक एक है' या तत्त्वज्ञानाने ती कार्यरत आहे.या कार्यक्रमात राज्यभरातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. ठाणे, पालघर, नाशिक, बीड, धुळे आदी जिल्ह्यांतील अध्यक्ष, सचिव, संपर्कप्रमुख आणि महिला आघाडी पदाधिकारी यांच्यासह एक जम्बो कार्यकारिणी या वेळी घोषित करण्यात आली. यामुळे संस्थेचे राज्यस्तरीय जाळे आणखी बळकट होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले.

नवीन प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर डॉ. विश्वास आरोटे यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत सांगितले, समाजकल्याण न्यास ही संस्था माझ्यासाठी केवळ सामाजिक कामाचे व्यासपीठ नाही, तर ती माझ्या विचारांची जननी आहे. पत्रकारितेमुळे मला समाजाच्या वेदना जवळून पाहण्याची संधी मिळाली. आता त्या वेदनांवर औषध देण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून करायचे आहे. दुसऱ्याच्या तव्यावर आपली पोळी भाजण्याची प्रवृत्ती न ठेवता, समाजासाठी दिलेली संधी ही जबाबदारी समजून पार पाडणार आहे. शिक्षण, आरोग्य, ग्रामीण उन्नती आणि समरसतेसाठी मी सदैव कटिबद्ध राहीन.कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे प्रवर्तक जे. के. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात त्यांनी कार्यकर्त्यांना हार-तुर्यांवर खर्च न करता दरवर्षी एका विद्यार्थ्याला वही-पेन देऊन वाढदिवस साजरा करण्याचा निर्धार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली.समाजकल्याण न्यास ही संस्था आज एक आंदोलन बनली असून, सेवा हीच ईश्वरसेवा या तत्वज्ञानाचा प्रकट साक्षात्कार घडवणारी आदर्श संस्थान म्हणून राज्यभरात मान्यता मिळवून आहे. नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ही सेवा अधिक व्यापक होईल, असा विश्वास सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

## 'चक्रम' लोकांना मंत्रिमंडळात ठेवू नका

# विट्सशी संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी;अंबादास दानवे यांचा संजय शिरसाटांवर हल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**-छत्रपती संभाजीनगर येथील विट्स हॉटेलच्या लिलावावरून पालकमंत्री संजय शिरसाट तसेच ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्यात वाद सुरू आहे. संजय शिरसाट यांनी या लिलावातून माघार घेतली आहे. परंतु अंबादास दानवे यांनी या सगळ्यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी केली आहे. तसेच संजय शिरसाट यांनी स्वतःहून आपण चक्रम असल्याचे कबूल केले आहे, तर अशा लोकांना मंत्रिमंडळात ठेवता कामा नये, अशी मागणी केली आहे.

अंबादास दानवे म्हणाले, मी त्यांना आव्हान केले होते की तुमचे पाच पार्टनर कोण आहेत ते जाहीर करावे, आता मी सांगितले आहे की त्यांच्याच घरातले पार्टनर आहेत. सगळे काही तुमच्यासमोर आहे. मला सगळे माहीत आहे म्हणूनच मी बोलतो आहे आणि म्हणूनच त्यांनी माघार घेतली आहे. संजय शिरसाट यातला महत्त्वाचा मुद्दा नाही, तर शासकीय यंत्रणा विशेषतः महसूल विभागाची आणि तिथे ते एसडीएम राठोड यांची भूमिका सुद्धा महत्त्वाची आहे. राज्य सरकार अशा अधिकाऱ्यावर कारवाई करणार की नाही करणार हा माझा प्रश्न आहे. पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे, महसूल मंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून पत्र दिले आहे, पण सरकार काही हलायलाच तयार नाही. सरकार सांगते की आम्ही भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे, तुमचेच मंत्री अशा पद्धतीने आणि अधिकारी पण भ्रष्टाचार करतात. आणि तुम्ही रोज याला नामांकन देता, त्याला नामांकन देता, काय नामांकन देता तुम्ही? तुमचा इथला अधिकारी महसूल विभागाचा सगळ्या अटी शर्थी बदलतो, साधे इन्कम टॅक्स तीन वर्षांचे विचारात नाही, ज्या मालमत्तेचा लिलाव करायचा त्याचे करंट वॅल्यूएशन काढले पाहिजे, ज्या दिवशी टेंडर निघाले त्या दिवशीचे वॅल्यूएशन काढले पाहिजे, हा वॅल्यूएशन कधीचे देतो १९८९ चे, तेव्हा याच्या बापचे राज चालू आहे का महसूल अधिकाऱ्याच्या?अंबादास दानवे म्हणाले, २०२२ चे वॅल्यूएशन १६०-१७० कोटी आहे, तर २०२५ चे वॅल्यूएशन काय येईल तुम्हीच बघा. आणि हा ४५ आणि ६५ मध्ये टेंडर काढतो अधिकारी. या अधिकाऱ्याला निलंबित करावे लागणार आहे सरकारला. एखादा महसूल विभागाचा एसडीएम आणि पालकमंत्री मिळून तिथे त्यांचा दबाव असल्याशिवाय त्यांचे काम करू शकत नाही. पण एखाद्या अधिकाऱ्याने दाबाखाली आले नाही पाहिजे. आणि शिरसाट काय बोलतात? मी चक्रम आहे, मी घर जाळून टाकेल तुमचे. मी राज्यपालांना आता पत्र पाठवत आहे थोड्याच वेळात. स्वतःच ज्यांनी कॅमेरासमोर



कबूल केले आहे की मी चक्रम आहे तर अशा लोकांना मंत्रिमंडळात ठेवता कामा नये. चक्रमचा अर्थ मराठीत वेडा असा होतो, मग वेड्या लोकांना कशीकाय जागा आहे? असा खोचक सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, बँकेच्या व्यवहारावर संजय शिरसाट यांनी बोलावे. त्यांचे रहस्य मला माहीत आहेत. नितेश राणेच काही दिवसांपूर्वी बोलले होते, मी तर अजून काही बोललो पण नाही. मागच्या काळातही त्यांच्या घरात एक प्रकरण घडले, मी त्यावर चकार शब्द बोललो नाही. त्याच्यात शेवटपर्यंत काय काय घडले हे मला सगळे माहीत आहे, पण मला त्या विषयात जायचे नाही. आणि मला काही देणे घेणे पण नाही. पण या हॉटेलच्या व्यवहारात महसूल विभाग, राज्य सरकार हे दोषी आहे. या महसूल अधिकाऱ्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे आणि चक्रम लोकांना मंत्रिमंडळात ठेवता कामा नये, असे मी राज्यपालांना पत्र लिहिणार आहे.माझ्याकडे सगळे पुरावे आहेत आणि मी ते मुख्यमंत्र्यांना पाठवले आहेत. तुम्हाला पाहिजे असतील तर तुम्हालाही पाठवतो थोड्यावेळाने. हे पहा कसे आहे त्यांनी फार मोठे व्हावे, त्यांनी ७२ व्या मजल्यापर्यंत लावला आहे हात, आणखी वर जावे काही हरकत नाही, त्याविषयी काही नाही. त्यांना काही अजून लागले तर आम्ही मदत करू त्यांना पण नियमात कायद्यात करावे असे आमचे म्हणणे आहे, असेही अंबादास दानवे म्हणाले.



भारत कृषक समाज शिष्टमंडळाने काल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची नागपूर येथे भेट घेतली. यावेळी चेअरमन डॉ प्रकाश मानकर, डॉ रमेश ठाकरे, प्रशांत तुरक, राजेंद्र गावंडे उपस्थित होते. यावेळी मंत्री महोदयांशी शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा झाली. निवेदन देण्यात आले.

# मुंबई-अहमदाबाद हायवेवरून खुलेआम गुटखा पालघरमध्ये!

## गुजरातहून रोज कोट्यवधींची तस्करी; अन्न प्रशासन झोपलेय का?

**पालघर । प्रतिनिधी**

राज्य सरकारने गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घातली असतानाही पालघर जिल्ह्यात दररोज कोट्यवधी रुपयांचा गुटखा गुजरातहून खुलेआम मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाने आणला जातोय. या अवैध गोरखधंद्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे.

गुजरातहून येणाऱ्या गाड्यांद्वारे वसई, विरार, पालघर, डहाणू तसेच जिल्ह्याच्या ग्रामीण भागांमध्ये हा प्रतिबंधित माल सहजपणे पोहोचतो आहे. यामध्ये स्थानिक पातळीवरील गुप्त हात व व्यापारी नेटवर्क सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जातो आहे.महाराष्ट्रात गुटखा, मावा, सुगंधित तंबाखूसह अनेक वस्तूंवर बंदी असूनही त्याची खुलेआम विक्री आणि वाहतूक ही अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेचं प्रतीक बनली आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत गुटख्याची सहज उपलब्धता हीच या यंत्रणांवर सवाल उपस्थित करते. गुटख्याच्या तस्करीमुळे राज्य शासनाच्या महसूलाचे मोठे नुकसान होत असून, दुसरीकडे तरुण पिढी आरोग्याच्या गंभीर संकटात सापडली आहे. कित्येक शाळकरी मुलेही या सवयीच्या आहारी गेल्याचे चिंताजनक चित्र आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून तक्रारी करण्यात येत असल्या तरी अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि महसूल विभागाकडून ठोस कारवाई झाल्याचे उदाहरण दिसत नाही. त्यामुळेच हा अवैध व्यवसाय आणखी जोमाने सुरू असल्याची जनतेत भावना आहे. मुंबई-ठाणे जिल्ह्याच्या प्रवेशद्वारावर असलेल्या पालघर जिल्ह्यातून राजधानीकडे गुटख्याचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याने, या भागावर विशेष लक्ष देणं आता अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा पालघर गुटखा तस्करीचं 'गेटवे' ठरू



शकतं. या अवैध गोरखधंद्यावर तात्काळ मोठ्या स्तरावर कारवाई करून दोषींना शिक्षा होणे गरजेचे आहे. अन्यथा प्रशासनाची मूकसंमती किंवा संगनमत असल्याची शंका बळावत चालली आहे.

## शाळा–महाविद्यालयांमध्येच मिळणार 'लालपरी'चे प्रवास पास

# मुलींना १०० टक्के, तर मुलांना ६६ टक्के सवलतीचा लाभ; मुख्याध्यापकांचे पत्र व बोनाफाईड आवश्यक

**नागपूर । प्रतिनिधी**

येत्या १६ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत असताना, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने विद्यार्थ्यांच्या बस प्रवासासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यंदा विद्यार्थ्यांना त्यांच्याच शाळा–महाविद्यालयांमध्ये एसटी बसच्या सवलतीच्या पासचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे बोनाफाईड प्रमाणपत्र व मुख्याध्यापकांचे अधिकृत पत्र आवश्यक असणार आहे.दरवर्षी एसटी महामंडळाच्या बसमधून जिल्हाभरात सुमारे १५ लाख विद्यार्थी सवलतीसह प्रवास करतात. यामध्ये मुलींना १०० टक्के सवलत देण्यात येते, तर मुलांना फक्त ३४ टक्के शुल्क भरून सवलतीचा पास मिळतो. ही सवलत एलकेजीपासून ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

मुलींसाठी विशेषतः 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत बस पास योजना' राबवली जाते. या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थिनींनी आपल्या शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र आणि एक छायाचित्र जमा करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित शाळा–महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आगारप्रमुखांना पत्र देऊन पास पुरवण्याची विनंती करावी लागेल. त्यानुसारच विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेतच पास वितरित केले जाणार आहेत.या संपूर्ण प्रक्रियेबाबत माहिती देताना महामंडळाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी म्हणाले, परगावांमधून शाळा–महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या शाळांमध्येच पास उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शाळा सुरू होताच त्यानुसार कार्यवाही केली जाईल.सध्या एसटी महामंडळाच्या इतर प्रवासी सवलतींमध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील वृद्धांसाठी मोफत प्रवास सुविधा तर महिलांसाठीही ५० टक्के सवलतीची योजना लागू आहे. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांसाठी सवलतीची व मोफत प्रवासाची ही योजना शिक्षणात येणाऱ्या अडथळे कमी करणारी ठरणार आहे.



## डहाणू खाडी जिंकणारी स्वरा;नरपड गावच्या स्वराचा जलपराक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी

**पालघर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नरपड गावातील कुमारी स्वरा समीर पाटील हिने आपल्या धाडसी आणि प्रेरणादायी कामगिरीतून जलक्रीडेमध्ये एक वेगळा ठसा उमठवला आहे. दिनांक ३ जून २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता तिने डहाणू खाडीचा दोन्ही बाजूंनी पोहून प्रवास पूर्ण करत एक अद्वितीय विक्रम नोंदवला.स्वराने डहाणू पैलाड ते डहाणू गाव या खाडीच्या सागरमार्गाचे अंतर केवळ ८ मिनिटे २४ सेकंदांत पार करत जलशौर्याचं उत्कट प्रदर्शन घडवलं. तिच्या या कामगिरीमुळे ती केवळ गावकऱ्यांची नव्हे, तर संपूर्ण पालघर जिल्ह्याची अभिमानाची पात्र ठरली आहे.

ही कामगिरी केवळ जलतरण स्पर्धेची नव्हे, तर साहस, चिकाटी, आत्मविश्वास आणि शारीरिक–मानसिक ताकदीचे दर्शन घडवणारी आहे. लाटांच्या आव्हानांवर मात करत तिने ही मोहीम पार पाडली.सध्या स्वरा वसई येथील वर्तक महाविद्यालयात बीएमएसच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. याआधी तिने वसई कला क्रीडा महोत्सवात दुसरा क्रमांक, तर वसई–विरार महानगरपालिका क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत आपली कौशल्यं अधोरेखित केली होती.स्वराच्या या यशामागे तिच्या पालकांचा पाठिंबा आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन मोलाचं ठरलं आहे. तिच्या या कामगिरीमुळे भविष्यातील जलतरणपटूंसाठी ती एक प्रेरणास्त्रोत ठरणार आहे.



## भारत विद्यालयात 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. समाजात पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून स्थानिक भारत विद्यालय, हिंगणघाट येथे राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेअंतर्गत इको क्लब च्या माध्यमातून देशी जातींच्या झाडांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड व उपमुख्याध्यापक किशोर चवरे प्रमुख उपस्थित होते.




कार्यक्रमाचे आयोजन व संचालन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक दत्ता भांगे यांनी केले. वृक्षारोपण उपक्रमात शारीरिक शिक्षण शिक्षक विनोद कोसुरकर, ग्रंथपाल विकास नागरकर, मुख्य लिपिक सचिन धारकर, शिपाई बालाजी आसुटकर, जगदीश झाडे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण करून वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्याची संरक्षण भिंत कोसळली; डागडुजीच्या कामावर प्रश्नचिन्ह!

### शिवप्रेमींमध्ये संताप; आमदार भोईर यांचा ठेकेदाराला जाब

**बदलापूर । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्याच्या अस्मितेचा मानला जाणारा ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला बुधवारी पुन्हा एकदा चर्चेत आला, पण यावेळी कारण ठरलं ते संरक्षण भिंतीचा कोसळलेला भाग! गोविंदवाडी बायपासकडील भिंतीचा मोठा भाग पहाटेच्या सुमारास कोसळल्याने किल्ल्याच्या डागडुजीच्या कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.दुर्गाडी किल्ल्याच्या दुरुस्ती व डागडुजीसाठी शासनाने १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, सद्यस्थितीत हे काम सुरू आहे. मात्र कामात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर झाल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच भिंत कोसळल्याने भविष्यातील धोके



अधोरेखित होत आहेत.

घटनेची माहिती मिळताच कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर व शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी ठेकेदार अधिकाऱ्यांना चांगलंच फैलावर घेतलं.पावसाळ्यात काम का सुरू ठेवलं? भिंत कोसळली, जीवितहानी झाली असती तर जबाबदार कोण? बकरी ईदला येथे मोठी गर्दी होणार असताना ही निष्काळजीपणा का? असे संतप्त सवाल त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना विचारले.कामाचा दर्जा अत्यंत शंका निर्माण करणारा असून, ठेकेदाराने लवकरच स्पष्टीकरण न दिल्यास शिवसेना स्टाईलने धडा शिकवू,असा सज्जड इशाराही आमदार भोईर यांनी दिला.या संपूर्ण प्रकारामुळे शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या किल्ल्याच्या संवर्धनात असा हलगर्जीपणा केवळ ऐतिहासिक ठेवा धोक्यात आणणारा नाही, तर सार्वजनिक सुरक्षेचाही प्रश्न निर्माण करणारा आहे.

## बिटलेचे आनंद आदलिंगे 'गुणवंत शिक्षक गौरव' पुरस्काराने सन्मानित

**मोहोळ । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत विद्या विकास प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या वतीने आयोजित 'गुणवंत शिक्षक गौरव' सोहळ्यात बिटले येथील आनंद सुरेश आदलिंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

हा पुरस्कार सोहळा ६ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता व्हीव्हीपी आयटी फंक्शन हॉल, इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, सोलापूर येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. जी. के. देशमुख होते. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. सुनीलदत्त कुलकर्णी (प्राचार्य, व्हीव्हीपी पॉलिटेक्निक), डॉ. अरुण गायकवाड (प्राचार्य, व्हीव्हीपीआयटी), अमोल चव्हाण (अध्यक्ष) व विविध संस्था पदाधिकारी उपस्थित होते.

आनंद आदलिंगे सध्या अनगर सिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ, अनगर या संस्थेत गणित विषयाचे अध्यापन करत असून, गेल्या तीन वर्षांपासून ते शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. कमी वयातच त्यांनी दाखवलेली अध्यापनातील निष्ठा, विद्यार्थ्यांवरील आत्मीयतेची भावना, व्रतस्थ सेवा आणि समाज घडवणाऱ्या शिक्षक म्हणून त्यांनी मिळवलेली ओळख या सर्व गुणांचा गौरव म्हणून



त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या फीडबॅकवरून प्रिय ठरलेले आदलिंगे सर गणित विषयाचे तज्ञ मानले जातात. त्यांची वाचनाची आवड आणि समाजाभिमुख दृष्टीकोन हेही त्यांच्या कार्याची बलस्थाने आहेत.या गौरवाबद्दल माजी आमदार राजन पाटील, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव, शाखा प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या.

## निरोगी शरीरासाठी व्यायाम अनिवार्य–बाळराजे पाटील

### पासलेवाडी येथे 'बाळराजे फिटनेस क्लब'चे भव्य उद्घाटन



**मोहोळ । प्रतिनिधी**

सध्याच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत शरीर निरोगी राखण्यासाठी व्यायाम हा आवश्यक घटक आहे. तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहून नियमित व्यायाम करावा, अशी सकारात्मक साद लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी दिली. पासलेवाडी (ता. मोहोळ) येथे 'बाळराजे फिटनेस क्लब'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या उपक्रमाचे आयोजन माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, तर माजी आमदार यशवंत माने यांच्या प्रयत्नातून करण्यात आले होते. ग्रामीण भागात आधुनिक व्यायाम साधनांचा लाभ मिळावा या उद्देशाने साकारलेला हा उपक्रम तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे बाळराजे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले.गावागावात निर्माण होत असलेल्या जिम, तालीम मंडळे आणि व्यायामशाळा या फक्त शरीर सुदृढ ठेवण्यासाठीच नव्हे तर मानसिक आरोग्यासाठीही महत्वाच्या आहेत. त्यामुळे या साधनांचा नियमित वापर करावा आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला राहुल पासले, तात्या शेटे, लक्ष्मण पासले, तानाजी पासले, विजय पासले, विष्णू शेटे, विजय करंडे, रंगनाथ माने, अनिल माने, भाऊसाहेब पासले, ग्रामपंचायत अधिकारी भालचंद्र गुंड यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दसुर येथे युवा उद्योजक मधुकर सावंत यांचा वाढदिवस उत्साही वातावरणात संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील दसुर येथील युवा व विकासाभिमुख उद्योजक मधुकर सावंत यांचा वाढदिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात खेळ पैठणीचा या विशेष उपक्रमाला महिलांचा भरघोस प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात प्रसिद्ध सिने अभिनेते रमेश परळीकर यांनी खास उपस्थिती लावून रंगत आणली.कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या, ज्यामध्ये 'होम मिनिस्टर'



ठरलेल्या महिलांना मानाची पैठणी, टीव्ही, गॅस शेगडी, कुकर अशा आकर्षक भेटवस्तूंनी सन्मानित करण्यात आले. याचबरोबर उपस्थित सर्व महिलांना खास स्मृतिचिन्हे देण्यात आली. या उपक्रमामुळे महिलांमध्ये विशेष आनंदाचं आणि कौतुकाचं वातावरण निर्माण झालं.

मधुकर सावंत हे विकासाभिमुख विचारसरणीचे युवा नेतृत्व म्हणून परिसरात ओळखले जात असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध संस्था, मान्यवर, मित्रपरिवार आणि तालुक्यातील युवावर्ग यांनी त्यांचं अभिनंदन करत त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मधुकर सावंत मित्रपरिवार, दसुर ग्रामस्थ, तसेच केबीएस डेव्हलपर्स पुणेचे सर्वेसर्वा किरण शेठ सावंत पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजेश बागल यांनी तर आभार प्रदर्शन माजी सरपंच दादासो सावंत पाटील यांनी केले. कार्यक्रमास युवक, महिलावर्ग आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून उपस्थितीचा उत्साह वृद्धिंगत केला.

## छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा गोळवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व उपसरपंच गैरहजर

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन ६ जून रोजी राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वैजापूर तालुक्यातील गोळवाडी ग्रामपंचायतीच्या वतीनेही महाराजांचा राज्याभिषेक दिन गौरवाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या आयोजनात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. परंतु,



ग्रामसेवक आणि उपसरपंच यांची गैरहजेरी विशेषतः लक्षवेधी ठरली. गावातील नागरिकांनी यावर नाराजी व्यक्त केली. राज्याभिषेक दिनाच्या कार्यक्रमाला सरपंच भाऊसाहेब पाटील शिंदे, माजी सरपंच संदीप मगर, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब मांजरे, गणेश मिसाळ, तसेच सुनील पगार, साईनाथ शिंदे, विक्रम शिंदे, भगवान मिसाळ, दगू आप्पा गावंडे आणि ग्रामपंचायत संगणक केंद्र चालक ज्ञानेश्वर पगार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपस्थितांनी छत्रपतींच्या जीवनकार्याचा आदर्श घेत सामाजिक ऐक्य आणि स्वाभिमान जोपासण्याचे आवाहन केले.

# संजय गाते यांनी स्वीकारला भाजप जिल्हाध्यक्ष पदाचा कार्यभार

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा भाजपच्या अध्यक्षपदाची जबाबदारी संजय गाते यांच्याकडे सोपविण्यात आली असून, आज त्यांनी अनेकांत स्वाध्याय मंदिर, वर्धा येथे पार पडलेल्या कार्यक्रमात अधिकृतरित्या पदभार स्वीकारला. यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, मावळते जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, माजी खासदार रामदास तडस आणि आमदार दादाराव केचे यांच्यासह भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

संजय गाते यांचा भाजपा जिल्हा शाखेच्यावतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना डॉ. भोयर म्हणाले, भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी संजय गाते यांची निवड ही पक्षाच्या कार्यकर्ता सन्मान परंपरेचे द्योतक आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट होईल याबद्दल शंका नाही. नवीन जिल्हाध्यक्ष संजय गाते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनी ही जबाबदारी स्वीकारताना अभिमान वाटतो. भाजपने आजवर जिल्ह्यात सशक्त कार्यसंस्कृती रुजवली असून, ती परंपरा पुढे नेत कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत यश मिळवू. गाते यांनी मावळते जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांच्या कार्याची प्रशंसा करत, त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. गफाट यांनीही आपल्या कार्यकाळातील सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत कार्यकर्त्यांनी संजय गाते यांना समान पाठबळ द्यावे, असे आवाहन केले. या वेळी माजी खासदार सुरेश वाघमारे, प्रदेश सचिव सरिता गाखरे, जिल्हा महामंत्री अर्चना वानखेडे, अर्चना वानखेडे, भूपेंद्र शहाणे, अविनाश देव, गुंडू कावळे, मिलिंद भेंडे, अतुल तराळे, शहर अध्यक्ष निलेश किटे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राहुल चोपडा यांनी केले तर आभार प्रदर्शन अशोक विजयकर यांनी केले. पदभार स्वीकारण्यापूर्वी संजय गाते यांनी श्रीराम मंदिरात दर्शन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यालयात अभिवादन, तसेच छत्रपती शिवाजी महाभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या स्मारकांना अभिवादन करून अष्टभुजा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले







# पांडुरंग सदाशिव खानखोजे शासकीय आयटीआय येथे शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात पार पडला

**वर्धा । प्रतिनिधी**

पांडुरंग सदाशिव खानखोजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा गौरवशाली कार्यक्रम राष्ट्रभक्तीच्या वातावरणात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात गटनिदेशक वाईकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी उलगडत शिवराज्याभिषेकाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमासाठी मुख्य वक्ते म्हणून प्रा. धर्मेंद्र मुंदडा यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी 'स्वदेशी विचारधारा' या विषयावर विचार मांडताना सांगितले की, देशाच्या आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशी वस्तूंचा जास्तीत जास्त वापर करणे अत्यावश्यक आहे. देशात निर्माण होणाऱ्या संसाधनांचा, तंत्रज्ञानाचा आणि उत्पादनांचा उपयोग करून स्वावलंबनाची वाटचाल करावी, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तसेच नागरी शिष्टाचार, कुटुंबप्रबोधन आणि पर्यावरण संवर्धन याविषयीही महत्त्वपूर्ण विचार मांडले.प्रमुख अतिथी प्रवीणकुमार गौड यांनी 'मातृत्व शक्ती' या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करत भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीचे स्थान समजावून सांगितले.आयएमसी सदस्य राहुल मुन यांनी मराठी तरुणांनी रोजगारासाठी नोकरीची वाट न पाहता स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून द्यावा, असे सांगितले. मराठी समाजात उद्योजकतेची भावना रुजणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

आयएमसी सदस्य सुधीर रेलकर यांनी कुटुंबसंस्थेतील परस्पर आदर, सुसंवाद आणि सहकार्याचे महत्त्व विशद करत समाजघटनामध्ये कुटुंबसंस्थेची भूमिका स्पष्ट केली.निसर्गसेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर मुरलीधर बेलखोडे यांनी पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे आवाहन केले.संस्थेचे प्राचार्य कोकुलवार यांनी अध्यक्षीय भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र समोर ठेवत युवकांनी समाज आणि राष्ट्रहितासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास भगत यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी बा. दे. हांडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जयघोष करून राष्ट्रभक्तीचा संदेश दिला आणि कार्यक्रमाची सांगता केली.कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कार्यक्रम अधिकारी कडुकर सर यांनी केले होते. गटनिदेशक जंवजाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेतील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मनापासून परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षणासोबत छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आत्मसात करावा-कमल छांगाणी




**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

संत बगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्धाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन पद्धतीने केले. कार्यक्रमाच्या संकल्पनेची मांडणी कौशल्य विकास व औद्योगिक प्रशिक्षण मंत्री मा. मंगल लोढा यांनी केली होती.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रताप अडसड यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार कमल छांगाणी यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.आपल्या प्रभावी भाषणात छांगाणी म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकापुरते शिक्षण मर्यादित ठेवू नये. छत्रपती शिवाजी महाराज आणि शहीद भगतसिंग यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन ते प्रत्यक्ष आचरणात आणली पाहिजे. त्यांच्या जीवनमूल्यांचा अंगीकार केल्यास खऱ्या अर्थाने राष्ट्रप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि आत्मभान निर्माण होते.कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी हेमंत जाधव (अध्यक्ष, आयएमसी), अजय ठाकूर, आनंद झामरे, श्रीकांत पर्वत, दर्शन राठी, नलिनी मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेंद्र गणवीर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य पी. एच. धोटे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेतील शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या निमित्ताने ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक कौशल्य विकास यांचा सुंदर संगम घडला, असे प्रशांत मुन यांनी बोलताना सांगितले. शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी जीवन विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, ध्येयनिष्ठा आणि नेतृत्वगुण प्रदान करते, असे ते म्हणाले.

# श्री.संत नगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

श्री. संत नगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. जेठानंद राजपूत उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे प्राचार्य वीरेंद्र पोटदुखे यांनी प्रास्ताविक भाषणात प्रवेश प्रक्रिया व शिकाऊ उमेदवारी योजना याविषयी सविस्तर माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अतुल नंदकिशोर शेंडे यांनी सामाजिक समरसता या विषयावर सखोल विचार मांडले. त्यांनी समतेवर आधारित समाजरचनेचे महत्त्व पटवून दिले. आयएमसी सदस्य पंकज अत्राम यांनी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व विषद करताना शिवाजी




महाराजांच्या दूरदृष्टीचे महत्त्व अधोरेखित केले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त संस्थेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांनी विशेष उत्साहाने पार पाडला. कार्यक्रमाचे संचालन निदेशक सुवर्णा गडकरी यांनी तर आभारप्रदर्शन निदेशक शालिनी चिप्पा यांनी केले. या कार्यक्रमाला हिंगणघाट येथील प्रतिष्ठित नागरिक दिनेश मुडे, आयएमसी सदस्य महाजन, तसेच त्रिशुल लोंढेकर, शरद कोणप्रतीवार, सचिन धारकर, किशोर चवरे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेतील निदेशक ठाकूर, ठाकरे, फटिंग, वानखेडे, डफ, अजानी, ससे, मारबते, भोयर, तसेच महिला निदेशक पिट्टलवार, गोहणे, चिमुरकर, गुजरकर, गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाला संस्थेतील माजी विद्यार्थी तसेच शहर व ग्रामीण भागातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जनजागृती रॅली, वृक्षारोपण आणि बीज गोळा कार्यशाळेचे आयोजन

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून धामणगाव रेल्वे नगरपरिषदेच्या वतीने आज एक भव्य जनजागृती रॅलीचे तसेच वृक्षारोपण आणि बीज गोळे तयार करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुनम कळंबे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली पार पडला.



नगर परिषद कार्यालय येथून सकाळी निघालेल्या रॅलीत प्लास्टिक बंदी निर्मूलन, 'एक पेड मा के नाम' आणि 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यात आला. या रॅलीमध्ये नगरपरिषद कर्मचारी, महिला बचत गट आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.रॅलीनंतर वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. विविध प्रकारची झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याच कार्यक्रमांतर्गत आयोजित बीज गोळे तयार करण्याच्या कार्यशाळेला चांगला प्रतिसाद लाभला. एकूण ५०० बीज गोळे तयार करण्यात आले असून, हे गोळे भविष्यात विविध ठिकाणी वृक्षारोपणासाठी वापरले जाणार आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी गोंडीक सर यांची नगरपरिषदेच्या पर्यावरणदूत म्हणून नेमणूक करण्यात आली.मुख्याधिकारी पुनम कळंबे यांच्या कुशल नियोजनामुळे आणि कार्यतत्परतेमुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. त्यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण नगरपरिषदेचा कर्मचारी वर्ग, अधिकारीवर्ग आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येत पर्यावरणपूरक उपक्रम राबवले. यामुळे धामणगाव रेल्वे शहरात पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे.मुख्याधिकारी कळंबे यांच्या प्रयत्नांमुळेच नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक जाणीव निर्माण झाली असून, अशा उपक्रमांमुळे धामणगाव रेल्वे हे 'हिरवे शहर' म्हणून पुढे येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# चिचोली शिवारात आगीत दोन लाखांची कापलेली ज्वारी खाक

## शेतातून जाणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब वाहिनीमुळे दुर्घटना



**पुलगाव । प्रतिनिधी**

धामणगाव रेल्वे तालुक्यातील चिचोली शिवारात शेतातून जाणाऱ्या महावितरणच्या ११ केव्ही उच्चदाब विद्युत वाहिनीमुळे लागलेल्या आगीत एका शेतकऱ्याचे सुमारे दोन लाखांचे नुकसान झाले. या आगीत कापून साठवलेली सुमारे ७० क्विंटल ज्वारी जळून खाक झाली आहे.

या भागातील शेतकरी केशव जुगलकिशोर टावरी यांनी फेब्रुवारी महिन्यात ५ एकर क्षेत्रात ज्वारीची पेरणी केली होती. मात्र, मार्च व एप्रिल महिन्यांत झालेल्या अवकाळी पावसामुळे कापणी लांबली होती. हवामान सुधारल्यानंतर १ जूनपासून मजुरांच्या साहाय्याने कापणी करून शेतात ढिगारे रचण्यात आले होते.आज दुपारी साधारणतः १२ वाजेच्या सुमारास अचानक शॉर्टसर्किट होऊन विद्युत तारांपासून ठिणग्या उडाल्या आणि ज्वारीच्या ढिगाऱ्याने पेट घेतला. त्यावेळी जुगल टावरी घरी जेवणासाठी पुलगावला गेले होते. त्यांना आगीची माहिती मिळताच ते तत्काळ शेतावर धाव घेत परंतु तोपर्यंत सर्व ज्वारी जळून खाक झाली होती. या घटनेत सुमारे ७० क्विंटल कापलेली ज्वारी पूर्णपणे भस्मसात झाली असून, त्याची बाजारभावानुसार अंदाजित किंमत २ लाख रुपये आहे. या नुकसानीने टावरी कुटुंब आर्थिक अडचणीत आले आहे.महावितरणच्या विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शेतकऱ्यांनी याची तात्काळ चौकशी करून नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

# धामणगावची लेक झळकतेय मराठी मालिकेची नायिका म्हणून! प्रतीक्षा पोकळे हिची संघर्षगाथा 'सावली होईन सुखाची'

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

ज्यांचं आयुष्य छोट्या गावात सुरू झालं, त्यांनाही मोठं स्वप्न पाहण्याचा पूर्ण अधिकार आहे! – हे शब्द फक्त भाषणापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्षात उतरवणारी कहाणी म्हणजे प्रतीक्षा पोकळे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तालुक्यातून आलेली ही मुलगी आज संपूर्ण महाराष्ट्राला टेलिव्हिजनच्या माध्यमातून प्रेरणा देत आहे.

सध्या सन मराठी वाहिनीवर प्रसारित होणाऱ्या 'सावली होईन सुखाची' या गाजत असलेल्या मालिकेत प्रमुख नायिकेची भूमिका साकारत असलेली प्रतीक्षा ही केवळ एक कलाकार नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सुप्त स्वप्नांची आणि जिद्दीची प्रतिनिधी ठरली आहे.

या मालिकेतील प्रमुख पात्र म्हणजे बिट्टी उर्फ राधा. मालिकेच्या पहिल्या पर्वात राधा या पात्राचे बालपण दाखवले गेले होते. आता 'सावली होईन सुखाची' या मालिकेच्या दुसऱ्या पर्वात प्रौढ राधाची भूमिका प्रतीक्षा पोकळे साकारत आहे. तिच्या सशक्त अभिनयामुळे या पात्राला नवीन उंची मिळाली आहे आणि प्रेक्षकांनीही या परिवर्तनाचा मनापासून स्वीकार केला आहे.प्रतीक्षाने आपले शिक्षण मुंबई विद्यापीठाच्या थिएटर आर्ट्स अकॅडमीतून पूर्ण करताना अभिनयाची शास्त्रशुद्ध तालीम घेतली. अभिनय क्षेत्रात सुरुवात करताना तिने 'क्राईम पेट्रोल'सारख्या मालिकांमध्ये काम करत कॅमेरासमोरील अनुभव घेतला. त्यानंतर 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेत तिने पावनी नावाने साकारलेल्या निगेटिव्ह भूमिकेने तिला प्रेक्षकांची ओळख मिळवून दिली.

सन २०२४ मध्ये 'सावली होईन सुखाची' या मालिकेत राधाच्या भूमिकेसाठी प्रमुख संधी मिळाल्यामुळे तिला




मोठी झेप घेता आली. ही भूमिका तिच्या संघर्षाच्या काळात मिळालेली पहिली मोठी संधी ठरली.प्रतीक्षाच्या अभिनयातील आत्मविश्वास, शिस्त आणि निष्ठा यामागे तिच्या घरातील पोलीस संस्कारांचे मोलाचे योगदान आहे. तिचे वडील महादेव पोकळे आणि आई शीला पोकळे – हे दोघेही सध्या अमरावती जिल्ह्यातील मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशनमध्ये सेवा बजावत आहेत. समाजासाठी अविरत झटणाऱ्या या पोलीस दाम्पत्याची कन्या अभिनय क्षेत्रात नावारूपाला येते आहे, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.

आई-वडिलांनी कधीच माझ्या स्वप्नांना मर्यादा घातल्या नाहीत. उलट त्यांनी शिकवलं की – 'शिस्तीत उभं राहूनच मोठं होता येतं,' असं प्रतीक्षा नेहमीच सांगते.'सावली होईन सुखाची' या मालिकेतील राधाच्या मुख्य भूमिकेबद्दल प्रतीक्षा सांगते, ही संपूर्ण कथा माझ्या पात्राभोवती फिरते. प्रेक्षक माझ्यातून संघर्ष पाहतात, स्वतःला शोधतात – हेच माझं मोठं यश आहे. तिची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री अभिनेता अमेय बर्वे याच्यासोबत विशेष गाजते आहे. या मालिकेचे दिग्दर्शन अमित छल्लारे आणि पंकज कांबळे यांनी संयुक्तपणे केले असून, महेश बेंडे आणि पद्मनाम राणे यांनीही या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रतीक्षाने या संपूर्ण टीमसोबत काम करताना अमूल्य अनुभव मिळवला आहे, असंही तिने नमूद केलं. सध्या प्रतीक्षा जढढ प्लॅटफॉर्मवरही काम करत असून मालिकांपलीकडेही आपली कारकीर्द घडवत आहे. माझं पहिले स्वप्न आहे – सिनेमागृहात प्रेक्षकांच्या टाळ्यांचा गजर अनुभवणं, असं ती ठामपणे सांगते. तिचं सोशल मीडियावरील अस्तित्व मर्यादित असलं, तरी तिचं कामच तिची खरी ओळख बनली आहे.ग्रामीण भागात वाढलेली, पोलीस कुटुंबातून आलेली, शिक्षणात प्रावीण्य मिळवलेली आणि आज मराठी टेलिव्हिजनवर लीड रोल निभावणारी प्रतीक्षा पोकळे – ही केवळ अभिनेत्री नाही, तर एका नव्या, स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्राची प्रेरणादायी नायिका आहे.

# करमाळा येथील हमाल भवनमध्ये कायदेविषयक शिबिर उत्साहात संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हमाल भवनमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे मार्गदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज एस. शर्मा, सचिव यु. पी. देवर्षी व तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष न्या. संजय मो. घुगे यांच्या पुढाकारातून झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या. संजय घुगे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे महत्त्व, असंघटीत कामगारांसाठीच्या विविध योजना, बांधकाम व शेती क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, तंबाखूविरोधी जनजागृती, तसेच बालस्नेही कायदेविषयक सेवा या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः 'ई-श्रम कार्ड'च्या उपयुक्ततेवर त्यांनी भर दिला.

या शिबिरात ड. राहुल सावंत यांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या अनुषंगाने मनोगत व्यक्त करताना कामगारांच्या हक्कांची माहिती दिली. ड. एस. ए. रोकडे यांनी असंघटीत कामगारांसाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या २०१५ मधील योजनेवर, ड. नवनाथ राखुंडे यांनी तंबाखूविरोधी दिन व २०२४ ची बालस्नेही कायदेविषयक सेवा यावर, तर ड. बलवंत राऊत यांनी बांधकाम व शेती कामगारांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांवर सखोल मार्गदर्शन केले.या शिबिरात करमाळा बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ड. रोकडे, हमाल पंचायतचे अध्यक्ष व आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक ड. राहुल सावंत, ड. बलवंत राऊत, ड. नवनाथ राखुंडे, ड. प्रशांत बागल आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ लिपिक आर. पी. खराडे व सुरज सुरवसे यांनी केले. प्रास्ताविक ड. राहुल सावंत यांनी केले, तर आभार प्रदर्शन ड. प्रशांत बागल यांनी मानले.कार्यक्रमास करमाळा तालुक्यातील हमाल, तोलार व माथाडी वर्गातील सुमारे १५० कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सागर सामसे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास लाभली.



## बकरी ईद पार्श्वभूमीवर तळोधीत पोलिसांचा संचलन मार्च



**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

येत्या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी तळोधी शहरात पोलीस विभागाच्या वतीने संचलन (मार्च) काढण्यात आले. तळोधी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलाँडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मार्चमुळे शहरात अनुशासन आणि सुरक्षिततेचा संदेश दिला गेला.

सदर संचलनादरम्यान पोलीस उपनिरीक्षक मानकर, पोलीस उपनगरीक्षक लांबट तसेच अन्य पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड यांचा सहभाग होता. शहरातील प्रमुख रस्त्यांवरून शांततेत पार पडलेल्या या संचलनाने नागरिकांमध्ये विश्वासाचं वातावरण निर्माण केलं आहे.सण उत्सव काळात अनुशासन आणि शांतता राखणे अत्यंत गरजेचे असते. पोलीस विभागाने वेळेपूर्वीच खबरदारी घेत नागरिकांच्या सुरक्षेसाठी केलेल्या या कृतीचे अनेकांनी स्वागत केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

## साक्री तालुक्यात विकसित कृषी संकल्प अभियानास प्रारंभ; गावोगावी रथातून शेतकऱ्यांमध्ये जागृती



**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यात शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध कृषी योजना व तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी विकसित कृषी संकल्प अभियानाला सुरुवात झाली आहे. हे अभियान कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र धुळे आणि आत्मा धुळे यांच्या संयुक्त पुढाकाराने राबवले जात आहे.

या अभियानाअंतर्गत रथाद्वारे गावागावात फिरून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती दिली जात असून, 'विकसित भारताचे संकल्पचित्र' व माहितीपट दाखवले जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये नवतंत्रज्ञान व योजनांबाबत जागरूकता निर्माण होत आहे.या प्रसंगी तालुका कृषी अधिकारी योगेश दिगंबर सोनवणे, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ जगदीश काथेपुरे, पंकज पाटील, कृषी विद्यापीठाचे डॉ. जे. एस. गायकवाड, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे शास्त्रज्ञ, वेटनरी विद्यापीठाचे श्री. प्रशांत पवार, तसेच मार्गदर्शक म्हणून जयराम गावी यांचे मार्गदर्शन लाभले.शेतकऱ्यांना कापूस व मका पिकांची योग्य पद्धतीने लागवड, मका बियाणे प्रक्रिया, फळबाग लागवड योजना, यांत्रिक साधनांसाठी मदतीच्या योजना, ठिबक सिंचन, कांदा साठवणूक चाळ, शेततळ्यांचे महत्त्व आणि गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ कृषी अधिकारी श्रीमती दीपमाला, कृषी उपअधिकारी गोकुळ पवार, प्रियंका भामरे, स्नेहल बोरसे, राजू बारसे, ललित अहिरराव, नैनेश पाटील, हर्षदीप बटवाडा, निखिल शिंदे, तसेच कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक विक्रांत पाटील व कृषी सहाय्यक राहुल पाटील यांनी परिश्रम घेतले.गावागावात फिरणाऱ्या या जनजागृती रथाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

## मंजुळाताईंनी उभारले न भूतो न भविष्यति आरोग्य शिबिर

### तपासणी,औषधे,मार्गदर्शन–सर्व काही एकाच ठिकाणी

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील पिंपळनेर नगरीत आरोग्यसेवेचा नवा इतिहास रचणारे भव्य महाआरोग्य शिबिर नुकतेच पार पडले. आमदार मंजुळा गावित, शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ. तुळशीराम गावित आणि सागर गावित यांच्या पुढाकाराने हे शिबिर घेण्यात आले. तालुक्यातील गोरगरीब, दुर्गम भागातील आदिवासी व गरजू नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सेवाभावी उपक्रमाचा लाभ घेतला.



या महाआरोग्य शिबिरात आजवर कधीच न पाहिल्या गेलेल्या स्वरूपात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली. सुमारे दहा हजारांहून अधिक नागरिकांची तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, औषधवाटप, विविध प्रकारच्या तपासण्या हे सर्व एका ठिकाणी आणि एकाच दिवशी उपलब्ध असल्याने नागरिकांत समाधानाचे वातावरण होते.

हे शिबिर शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, शिवसेना पक्ष, व आमदार मंजुळा गावित यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळनेर येथील एन. एस. पी. विद्यालयाच्या परिसरात सकाळी ८ वाजता सुरू झाले. उद्घाटन आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थान डॉ. तुळशीराम गावित यांनी भूषवले.या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. दत्ता देगावकर (जिल्हा शल्यचिकित्सक), सचिन बोडके (जिल्हा आरोग्य अधिकारी), रावसाहेब सोनवणे (तहसीलदार), गटविकास अधिकारी सोनवणे, डीवायएसपी संजय बंबाळे, एपीआय किरण बर्गे, गट शिक्षणाधिकारी पगारे, तहसीलदार शेजवळकर, माजी जि.प. सदस्य गोकुळसिंह परदेशी, विशाल देसले, ज्ञानेश्वर एखंडे, हिम्मत साबळे, राजकुमार पाटील, संगीता पगारे, भालचंद्र दुसाने, पंकज मराठे, प्रशांत चौधरी, मंगलदास सूर्यवंशी, अजय सोनवणे, राहुल भोसले, बाळा शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसेना कार्यकर्ते व आरोग्यसेवक उपस्थित होते.

तालुक्यात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा गावाच्या दारात आणली गेल्याने जनतेकडून ही सेवा नव्हे तर आपुलकीचा स्पर्श अशा शब्दांत समाधान व्यक्त होत आहे.

## हरदयाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा





**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हरदयाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुलगाव येथे दिनांक ६ जून २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम अत्यंत मंगलमय व पवित्र वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका समरसता प्रमुख विजय निवल यांनी भूषविले, तर प्रमुख वक्ते म्हणून संघाचे विभाग शारीरिक प्रमुख सचिन मुळे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना स्वदेशी विचार व स्वदेशी वस्तूंच्या वापराचे महत्त्व पटवून दिले. प्रमुख अतिथी म्हणून सागर कपूर आणि शिरीष ठाकरे (खचउ सदस्य) यांची उपस्थिती होती. याशिवाय दिनकर ओक, देविदास डाहे, श्रीमती बुरकुंडे (प्राचार्य, ज्ञानभारती हायस्कूल, पुलगाव) आणि प्रा. प्रतिभा रायपुरे (प्राचार्य, कृष्णाताई हायस्कूल, पुलगाव) हेही विशेष उपस्थित होते.कार्यक्रमात कीर्ती भोसले (निदेशक, टेक्निकल हायस्कूल, देवळी) यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र सविस्तर व प्रेरणादायी पद्धतीने समजावून सांगितले. या वेळी संस्थेतील माजी प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या पालकांचीही विशेष उपस्थिती होती.प्राचार्य संजय कोकुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली गटनिदेशक शंकर हुलके आणि आर. के. गुंडापुरे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. संस्थेचे भांडारपाल आनंद सोनटक्के यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांसाठी चहा-नाश्त्याची व्यवस्था केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष श्रीरामे यांनी केले. प्रास्ताविक शंकर हुलके यांनी केले तर आभार प्रदर्शन बोबडे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे निदेशक म्हणावी, शिंगाडे, कोचे, डोळस, खर्चे, म्हस्कर, चव्हाण, महाजन, कराळे, मेश्राम, चौधरी, सावंत, वाघमोडे, काकडे, साखरे, लोहकरे, कोठारी, केवटे, येणे, शेंडे, वानखडे, रवी मांजरेकर, नूडल, रघाटाटे यांच्यासह सर्व कर्मचारी वर्ग व प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.शिवराज्याभिषेक दिनानिमित्त संस्थेत मागील तीन दिवसांपासून निबंध, चित्रकला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# आपण जगभरात स्वत:चे रक्षण करू शकत नाही–विलास खैरना

**सोलापूर । प्रतिनिधी**

जीवनाप्रमाणेच, राजकारण आणि राजनयातही जे काही अलिखित असते, तेही तेवढेच बोलके असते. ऑपरेशन सिंदूर नंतर युद्धबंदीची घोषणा झाली स्पष्टपणे श्रेय घेण्यासाठी पण त्यामागचे मौन हे पाकिस्तानच्या, दहशतवादाच्या केंद्रस्थानी असलेल्या भूमिकेबाबत फार काही सांगून गेले.जेव्हा वर्ल्ड ट्रेड सेंटरचे जुळे टॉवर उद्ध्वस्त झाले आणि पेंटागॉनवरही हल्ला झाला, तेव्हा मानवी इतिहासातील सर्वात मोठ्या इस्लामिक दहशतवादी हल्ल्याचा बळी अमेरिका कशी बनली, हे अमेरिका विसरू शकते काय? अल-कायदाच्या ओसामा बिन लादेनच्या आश्रयाखाली घडवण्यात आलेल्या त्या हल्ल्यांत २,९७७ अमेरिकन नागरिक ठार झाले, हजारो जखमी झाले, १० अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीची मालमत्ता नष्ट झाली आणि सुमारे ४.३ लाख लोक बेरोजगार झाले. ९/११ नंतर, या दहशतवादी कृत्यांमुळे २००० हून अधिक अकाली मृत्यूंची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, विषारी धुरांमुळे त्रस्त झालेल्यांची संख्या ३०% ने वाढली आहे. लादेनला शोधून त्याला ठार मारण्यासाठी अमेरिकेला तब्बल दहा वर्षे लागली. आणि तो कुठे सापडला? पाकिस्तानच्या अबोटाबाद शहरात, एका उच्च सुरक्षा युक्त निवासस्थानी आपल्या कुटुंबासह ऐषआरामात राहणारा पाकिस्तान आर्मी अकादमीपासून फार दूर नाही. हे पाकिस्तान आणि दहशतवादी यांच्यातील नाते अधोरेखित करत नाही का?

आज अमेरिका पाकिस्तानमधील दहशतवादी गटांवर आणि व्यक्तींवर निर्बंध घालत आहे. त्यात मसूद अझहरच्या जैश-ए-मोहम्मदचा समावेश आहे. २०१९ पासून मसूद अझहर संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी यादीत आहे. हाफिज सईदच्या लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उद-दावा या संघटनांनाही अमेरिका, युरोपियन युनियन, रशिया आणि भारताने दहशतवादी संघटना घोषित केले आहे. २००८ च्या मुंबई हल्ल्याचा सूत्रधार झकी-उर-रहमान लखवी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध यादीत आहे. १९९३ च्या बॉम्बस्फोटांसाठी



जबाबदार असलेला हिजबुल मुजाहिदीनचा सय्यद सलाहुद्दीन आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम यांनाही अमेरिका आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करते. अमेरिकेच्या दहशतवाद प्रायोजक यादीत पाकिस्तानला दहशतवाद्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान म्हणून संबोधले गेले आहे. जिथे दहशतवादी आणि त्यांच्या टोळ्या नियोजन, भरती, प्रशिक्षण व हल्ले यासाठी संधी मिळवतात. परंतु संयुक्त राष्ट्रे आणि अमेरिकेने ज्या दहशतवाद्यांवर निर्बंध लादले आहेत, ते पाकिस्तानात अजूनही मोकळेपणे वावरताना दिसतात. सर्वच आंतरराष्ट्रीय शक्तींनी युद्धबंदीचा ध्वज फडकावला, पण भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष केवळ युद्धबंदीने मिटू शकतो का? पाकिस्तानने प्रायोजित केलेल्या पहलगाम हल्ल्याचा प्रतिशोध म्हणून ऑपरेशन सिंदूर ची मोहिम राबवण्यात आली, हे सर्वज्ञात आहे. जो देश स्वतः ओसामा बिन लादेनला पाकिस्तानात शोधून ठार करू शकतो, त्याच देशाचे राष्ट्राध्यक्ष युद्धबंदीनंतर पाकिस्तानला शहाणपणाची भूमिका म्हणून दाद देतात, पण आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांबाबत निषेध करायला विसरतात, ही ढोंगबाजी नाही काय? पाकिस्तानने गेली कित्येक दशके आपल्या भू-राजकीय स्थानाचा फायदा घेत जबाबदारी झटकण्याचे राजकारण केले आहे. मात्र भारताने या दुटप्पीपणाचा ठाम विरोध करायला हवा. जागतिक शक्तींनी पाकिस्तानच्या भूमिकेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, आणि एमएलएफ सारख्या संस्थांनी पुन्हा एकदा या दहशतवाद पोसणाऱ्या राष्ट्राला बक्षीस दिले. भारताला मात्र भूतकाळ विसरण्याची सोय नाही. आपल्यासाठी पाकिस्तानमधील दहशतवाद हा वास्तव आहे केवळ राजकीय खेळ नव्हे. ऑपरेशन सिंदूर ही भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराची निर्णायक घोषणा होती. या मोहिमेच्या माध्यमातून भारताने दाखवले की, सहनशक्तीचा काळ संपला आहे.परंतु भारताच्या या ठाम भूमिकेला जागतिक प्रतिसाद ठाम नव्हता. पाकिस्तानच्या भूमिकेचा जागतिक निषेध न होणे, हे गंभीर वास्तव अधोरेखित करते आपण आपली सुरक्षा जगावर सोपवू शकत नाही.आपल्यालाच दहशतवादाविरुद्धचा लढा लढावा लागेल. तो निर्णायक असला पाहिजे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .